## रे.मु.नं.५३/१३ मधील निशाणी क.२२ वरील आदेश
**(CNR NO-MHRG14-000278-2013)**

*रमेश पिलानी ... वादी*
*विरुध्द*
*बाळकृष्ण पाटील, वगैरे ... प्रतिवादी*

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा दुरूस्त होवून मिळणेसाठी केला आहे. प्रकरणात प्रतिवादी क. १ यांचेविरुध्द एकतर्फा, प्रतिवादी क. ३ ते ७ यांचेविरुध्द विना कैफियत व प्रतिवादी क. २ व ८ विरुध्द अबेट झाल्याचा आदेश पारीत झाले आहेत. प्रकरणात दाखल सर्व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

२. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुतचा दावा त्यांनी प्रतिवादींविरूध्द ठरावाकरीता, कराराची विशेष पूर्ततेकरीता व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने प्रतिवादींना दि.१२/१०/२०१२ रोजी नोटीस पाठविली होती. त्याची बजावणी त्यांना होवून त्यांनी त्या नोटीसची पूर्तता न केल्याने दाव्यास कारण घडले आहे. त्यापूर्वी वादीचे वतीने दि.२९/०१/२००७ रोजी प्रतिवादींना पत्र पाठवून व्यवहार पूर्ण करण्याबाबत कळविले होते. परंतु दाव्यातील कथनात अधिक स्पष्टता येण्यासाठी, वाढीव खुलासा व मजकूर दाव्यात वाढविणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीने दाव्याचे कारणात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रतिवादींच्या बचावावर देखील फरक पडत नाही. त्यामुळे अर्जासोबत दिलेल्या परिशिष्ठानुसार दावा दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

३. प्रकरणातील न्यायालयीन अभिलेखाचे काळजीपर्वुक अवलोकन केले. प्रकरणात वादीने मागितलेली दुरुस्ती पहाता हे स्पष्ट होते की, वादीने प्रस्तावित दुरुस्ती दाव्यात स्पष्टता येण्यासाठी वाढीव खुलासा करण्याच्या अनुषंगाने सुचविली आहे. त्यामुळे वादी म्हणतो अशा दुरूस्तीस जर परवानगी दिली तर दाव्यातील मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. वादीला त्याच्या दाव्याच्या अनुषंगाने कथन करण्याचा पूर्णपणे कायदेशिर हक्क व अधिकार आहे. त्याबाबत प्रतिवादींना कसलाही आक्षेप घेता येणार नाही. प्रतिवादी सदरचे कथन नाशाबीत करण्यासाठी तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा देवु शकतात. मात्र त्यांना वादीला अशा प्रकारे कथन दाव्यात करता येणार नाही किंवा वादीने त्याच्या दाव्यात काय कथने

करावीत याबाबतही कसलाही आक्षेप घेता येणार नाही, असे कायद्याचे प्रस्थापित तत्व असल्याने वादी मागतो तशी दुरूस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

**४.** माझे मताप्रमाणे वादी मागित असलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मूळ दाव्यातील वादविषयाशी संबंधीतच आहे. दाव्याचे आणि प्रतिवादींच्या कैफियतीचे स्वरूप आणि वादीने मागीतलेली प्रस्तावित दुरुस्ती लक्षात घेता दुरुस्ती केल्याशिवाय सदरचा दावा अंतिम निर्णयाप्रत येऊ शकणार नाही. तसेच दाव्याचे अनेकीकरण चुकवून वादी व प्रतिवादी यांचेतील दाव्यांची संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने सदरची दुरूस्ती करणे न्यायोचित ठरणार आहे अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

**५.** तथापि, वादीने सदरचा दावा दाखल झाल्यानंतर ब-याच उशिराने हा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे हा अर्ज देईपावेतो वादी का थांबला व तसा विलंब का लावला याचे समाधानकारक उत्तर वादीचे अर्जावरुन मिळत नाही. सदर विलंबासाठी वादीने कोणतेही योग्य कारण दर्शविलेले नाही, त्यामुळे सदर विलंबासाठी वादी हाच सर्वस्वी दोषी ठरतात. त्यामुळे दाव्याचे कामही लांबणीवर पडले आहे. या सर्व कारणांचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. वादीचा (नि.क्र.२२) चा अर्ज रक्कम रु.१०००/- चे खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. वादीस असे आदेशित करणेत येते की, त्याने सदर अर्जाचे खर्चापोटी रक्कम रु.१०००/- विधी सेवा समिती, उरण यांना देण्याची आहे.

३. वादीने विहीत मुदतीत दावा दुरुस्ती करुन त्याची प्रत देण्याची आहे.

( खुले न्यायालयात अधिघोषित)

उरण.
दिनांक : ३०/०१/२०१९

(प्रि.म.पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.